जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2018
Times of India

# SUK to provide financial aid to 12 weak institutions

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The management of Shivaji University, Kolhapur (SUK) has decided to provide financial assistance to 12 financially weak colleges located in the rural parts of Kolhapur, Satara and Sangli districts.

SUK pro-vice chancellor D T Shirke said that the financial assistance may go up to a maximum of Rs 75,000 for the arts and commerce faculties and Rs 1 lakh for the science faculty.

Shirke added that despite weak financial status and their remote location in the division, the selected colleges are bringing good results. As a token of appreciation, the university will aid these colleges from its internal funds.

Under the scheme, financial help will be offered to the colleges for equipping themselves with the minimum infrastructure— computer, laptop, fax machine, LCD projector, digital camera, generator and educational material, he said.

Shirke added that a selection committee, headed by the vice-chancellor, scrutinised the colleges early this year to select the ones who are eligible to receive financial assistance. The decision to grant them aid was taken in the management council meeting held in January.

He said that the eligible colleges will not just receive financial aid. The varsity will also help them with self-instruction material which is quite useful for studying various subjects.

It is to be noted that of the 282 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur that fall under the jurisdiction of the university, 156 colleges offer conventional courses like arts, science and commerce at a nominal fee. 26 colleges fall under the permanently non-granted status.

**The financial assistance may go up to a maximum of Rs 75,000 for the arts and commerce faculties and Rs 1 lakh for the science faculty. Besides financial aid, help will also be offered to the colleges for equipping them with the minimum infrastructure— computer, laptop, fax machine, LCD projector, digital camera, generator and necessary educational material**



जनसपर्क कक्ष
12 FEB 2018 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



डी.आर.माने महाविद्यालयात आयोजित गुणगौरव समारंभात बोलताना डॉ.डी. टी.शिर्के. व्यासपीठावर प्राचार्य प्रवीण चौगुले, संस्थेचे अध्यक्ष वसंतराव देशपांडे, उपाध्यक्ष सुमील माने, संचालक बिपीन माने आदी.

# विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम बनावे : शिर्के

## डी.आर.माने महाविद्यालय गुणगौरव

**कागल / प्रतिनिधी :**

आपला ऐतिहासिक ठेवा अमूल्य आहे.आपला स्थानिक इतिहासही महत्त्वाचा आहे. यासाठी स्थानिक इतिहास अभ्यासायला हवा. आपली वाचन संस्कृती जोपासा. नेहमी संयमी संपादनासाठी चिकित्सक बना. आजचा गुणगौरव ठेव म्हणून ठेवा. त्यावरील व्याज म्हणजे प्रेरणा होते. विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम व संवेदनशील बनावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी .टी.शिर्के यांनी केले.

येथील डी.आर.माने महाविद्यालयात आयोजित केलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात डॉ.शिर्के बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव देशपांडे होते. संस्थेचे सचिव प्रताप ऊर्फ भैया माने, उपाध्यक्ष सुनील माने, संचालक बिपीन माने, प्राचार्य डॉ.प्रवीण चौगले, बी. जी. कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी वर्षभरात जिल्हा, राज्य, देश पातळीवर यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच सिनेट सदस्य प्रताप ऊर्फ भैया माने, प्राचार्य डॉ.प्रवीण चौगले, अमरसिंह रजपूत तसेच कर्टीन ( ऑस्ट्रेलिया )विद्यापीठातून केमिकल इंजिनीअरिंगमधून पीएच.डी. पूर्ण केल्याबद्दल डॉ. शर्मिली माने यांचा डॉ.शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वागत व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा तसेच पाहुण्यांची ओळख प्रवीण चौगुले यांनी करून दिली. प्रास्ताविक जिमखानाप्रमुख श्रीनिवास पाटील यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.हसिना मालदार यांनी, तर प्रा.बी.आर.पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.बाबासाहेब पाटील, प्रा.एकसंबेकर तसेच विद्यार्थी सचिव राहुल पाटील यांनी परिश्रम घेतले.

12 FEB 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी संकल्पनात्मक शिक्षण घ्यावे

## कुलगुरू डॉ. विद्यासागर : इंग्रजी अधिविभागामार्फत ज्ञानविस्तार व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : विद्यार्थ्यांनी कृतिशील शिक्षणाकडे वळताना संकल्पनात्मक शिक्षणाची कास धरली पाहिजे. विद्यार्थ्यांनी सुप्त कौशल्यगुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागामार्फत ज्ञानविस्तार व्याख्यानमालेंतर्गत 'करिअरचा मार्ग कसा निवडाल? पायवाट की



**कोल्हापूर : मार्गदर्शन करताना डॉ. पंडित विद्यासागर. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

आडवाट?' या विषयावर ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात हा कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. विद्यासागर म्हणाले, "करिअरमध्ये उत्तुंग यश प्राप्तीसाठी तुमची ऊर्जा सामान्य उर्जेपेक्षा दीडपट जास्त असली पाहिजे. यासाठी आपले मन, बुद्धी, शरीर सुदृढ असले पाहिजे. स्पर्धेच्या जगात वावरताना एकाच वेळी अनेक गोष्टी करण्याची कला अवगत केली पाहिजे. शिक्षकांवर कायमस्वरूपी अवलंबून न राहता आवश्यक असेल, तेव्हाच त्यांची मदत घ्यावी."

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, की विद्यार्थ्यांनी आपल्यामधील क्षमता ओळखून करिअरची निवड करताना व्यापक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. आजचे आधुनिक जग तंत्रज्ञानाने व्यापलेले असल्याने करिअर करण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्तम संधी प्राप्त झाली आहे. इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. सी. ए. लंगरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. एम. सरवदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पी. बी. माने यांनी आभार मानले. या वेळी सौ. विद्यासागर, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह विविध अधिविभागातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

12 FEB 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैचारिक देवाण-घेवाणीतून देशाचा विकास

## 'मून२०१८'च्या उद्घाटनप्रसंगी रोटरीचे डिस्ट्रिक्ट गर्व्हनर आनंद कुलकर्णी यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

रोटरी ही संस्था संयुक्त राष्ट्र संघापेक्षा अनेक देशात पोहचली आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे संविधान करण्यामध्ये रोटरीचा मोठा वाटा आहे. म्हणून 'मून२०१८" सारख्या कार्यक्रमांचे नियोजन केले जाते. अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे वैचारिक मंथन होते. तसेच वैचारिक देवाण घेवाणीतून देशाच्या एकात्मता वाढीस लागून, देशाचा विकास होण्यास मदत होईल, असे मत रोटरी डिस्ट्रीक्ट गर्व्हनर आनंद कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मून-२०१८" च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील होत्या.

या कार्यक्रमात राज्यभरातून ३६ महाविद्यालयातील संघ सहभाग नोंदवला आहे. ७२ विद्यार्थ्यांनी ३६ राज्याचे प्रतिनिधीत्व केले. 'अंमली पदार्थांचा व्यापार आणि गैरवापर" 'स्त्रिया आणि लहान बालकांचा व्यापार" तसेच 'आण्विक उर्जेचा सकारात्मक वापर" या दोन विषयावर प्रत्येक संघाने आपआपल्या देशाची भूमिका स्पष्ट केली.

सर्व संघांनी त्या त्या देशाची वेशभूषा केली होती. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. ३६ संघांनी आपआपल्या देशातील नृत्य सादर केले.

कुलकर्णी म्हणाले, 'मून२०१८"च्या कालावधीत युवा पिढीला प्रेरणा मिळते. प्रत्येक विद्यार्थ्याची बुध्दीमत्ता वेगवेगळी असते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकास होऊन यातूनच देशाचे नेतृत्वही घडते. म्हणूनच रोटरी दरवर्षी अशा प्रकारचे आयोजित करून विद्यार्थ्यांना व्यासपीठ निर्माण करून देते. तसेच प्राथमिकपासून ते उच्च शिक्षणापर्यंत ई-लर्निंगची सुविधा, मुलांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून शुध्द पाणी देण्याचा प्रयत्न रोटरी करते. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी विविध दोन देशांना भोडसावणाऱ्या प्रश्नावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून विशाखा आपटे, सोनल जोशी, नेहा वाडेकर यांनी काम पाहिले.

स्वागत रोटरी करवीरचे अध्यक्ष विशाल जांभळे यांनी केले. सचिव प्रमोद चौगले यांनी आभार मानले. यावेळी रोटरीचे नसिर बोरसदवाला, रोटरी गर्व्हनर ऋषीकेश केसकर, चेअरमन निशिकांत नलवडे, दिलीप शेवाळे, मनोज कोळेकर, मोनिका कल्लोळी, डॉ. नितीन माळी, प्रशांत मेहता, अमित मोरे, वारना वडगावकर, संभाजी पाटील, शितल दुग्गे, स्वप्निल कांबळे, अंकुश कारंडे, दिलीप प्रधाने, चंद्रकांत कागले, सुभाष आलेकर, प्रशांत मेहता आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित 'मून-२०१८" च्या उद्घाटनप्रसंगी ३६ देशांच्या प्रतिनिधींबरोबर गर्व्हनर आनंद कुलकर्णी. सोबत रोटरीचे नसिर बोरसदवाला, ऋषीकेश केसकर, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश पवार, विशाल जांभळे, निशिकांत नलवडे, दिलीप शेवाळे, प्रमोद चौगले, आदी.

### विद्यापीठात ३६ देश अवतरले

शिवाजी विद्यापीठात आपआपल्या देशाची वेशभूषा करून ३६ देशाच्या प्रतिनिधींनी कार्यक्रमाच्या सुरूवातीला विद्यापीठ परिसरात रॅली काढली. विद्यापीठ परिसरात ३६ देशाचे झेंडे दिसत असल्याने जणू ३६ देशच अवरल्याचा अनुभव आला. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर विद्यार्थ्यांनी फोटो काढण्यासाठी गर्दी केली होती. या रॅलीमध्ये ३६ देशाच्या प्रतिनिधींबरोबर चाटे इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी होती.

12 FEB 2018 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'मून-२०१८' मध्ये सहभागी झालेले विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी प्रतिनिधी. (छाया : नाज ट्रेनर)

# 'मून'मध्ये सहभागी विद्यार्थ्यांची रॅली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात मून-२०१८ निमित्त सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी (संयुक्त राष्ट्र संघाचे प्रतिनिधी) त्या-त्या देशांची वेशभूषा करीत हातात झेंडे घेऊन रॅली काढून लक्ष वेधले.

रोटरी क्लब ऑफ करवीर आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'मून-२०१८' (मॉडेल युनायटेड नेशन) कार्यक्रमाचे उद्घाटन रविवारी (दि. १०) सकाळी झाले. दरम्यान, सकाळी मूनमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतपासून रॅली काढली. यांप्रसंगी रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर आनंद कुलकर्णी म्हणाले, रोटरी ही संस्था अनेक देशांत कार्यरत आहे. संयुक्त राष्ट्र संघाचे संविधान तयार करण्यात योगदान दिले आहे.

यावेळी जनरल सेक्रेटरी नासिर बोरसदवाला, प्रा. डॉ. भारती पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. रोटरी क्लब करवीरचे अध्यक्ष विशाल जांभळे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रशांत मेहता यांनी केले. सचिव प्रमोद चौगुले यांनी आभार मानले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रकाश पोवार, ऋषिकेश केसकर, निशीकांत नलवडे, दिलीप शेवाळे, मनोज कोळेकर, मोनिका कल्लोळी, डॉ. नितीन माळी, संभाजी पाटील, शीतल दुगे, नवीन पटेल, संजय पाटील, चंद्रकांत कागले, सुभाष आलेकर आदी उपस्थित होते.

12 FEB 2018
Times of India

# UGC tells universities to put accreditation status online

Piyush.Bhusari
@timesgroup.com

## WHY IS IT IMPORTANT?

- The accreditation regulates quality of education and also ensures that educational institutions keep a constant check on their performance
- The assessment helps the UGC to disburse annual finances under various schemes to the government run and private aided colleges across the state
- It creates an automatic pressure to maintain the education quality and to improvise on the infrastructure facilities to avail the financial aid from the government
- Acts as a guiding information for students and parents, whether to take admission in particular institute or not, depending on their assessment rating

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked universities and academic institutions across the country to display their accreditation status on their (institution's) website.

In a circular, dated February 8, the UGC said if any institution is non-accredited, it shall also be shown.

In the circular, UGC secretary PK Thakur said the Union government has taken various decisions regarding reforms in higher education , one of which is to have access to relevant information related to higher educational institutions (HEI) in order to help them in taking informed decisions.

"It has been advised that HEIs shall prominently display accreditation grade or unaccredited status as mentioned in the certificate/letter of the accrediting agency/authority on the websites for public information. In case of HEIs that are eligible but have not applied for accreditation, this status shall also be prominently displayed on the home page of their website," the circular read.

Stating that un-aided colleges have higher rate of non-compliance to accreditation, SUK pro-VC D T Shirke said, "Stakeholders should know the accreditation status of the institute in which they are investing. In a workshop last week, we asked un-aided colleges to comply with the said UGC norms."

"We have almost 50% un-aided colleges and many of them need to comply with the guidelines at the earliest," he said.

Another SUK official said the assessment from an accrediting agency denotes the standards of quality and whether the particular college is following it or not.

"If the college achieves the standard, the agency's goal of quality education is also fulfilled," he said.

जनसंपर्क कक्ष
12 FEB 2018 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity readies CBCS system

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur has prepared the structure of choice-based credit system (CBCS) and sent it to the state government for assessment.

Vice-chancellor Devanand Shinde said "We are waiting for the feedback. Once given the green signal, we will implement it. By this rate we might as well be implementing it from 2018-19 academic year.

An SUK official said the CNCS will be able to provide flexible learning approach for students and student can take interdisciplinary subjects along with their regular courses. For instance, an undergraduate student of science can choose to study subjects from arts or commerce streams.

Students will be able to opt for courses of their choice and pursue skills to enhance their employability, the official said.

The adaptation of CBCS across universities would ensure seamless mobility of students as well as transfer and mutual recognition of credits, the official added.

SUK has moved to a credit-based grading system two years ago, where a fixed number of credits per subject are allotted in a semester.

The University Grants Commission had asked universities and colleges to submit data on the uniform implementation of the CBCS.

12 FEB 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एमबीए परीक्षेसाठी बुधवारपर्यंत अर्ज भरा

## डॉ. बी. एस. सावंत : विद्यार्थ्यांचा एमबीएकडे वाढता कल; मोठ्या प्रमाणात करिअरची संधी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : "एमबीएच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात करिअरची संधी असून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये एमबीए शासकीय प्रवेश परीक्षा १० आणि ११ मार्चला होत आहे. पदवीच्या अंतिम वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी १४ फेब्रुवारीपर्यंत अर्ज भरावेत", असे आवाहन कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक, शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. बी. एस. सावंत यांनी पत्रकार परिषदेत केले.

डॉ. सावंत म्हणाले, "देशाच्या शैक्षणिक नकाशावर शिवाजी विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत शैक्षणिक दर्जा सिद्ध केल्यामुळेच जिल्ह्यातील व्यवस्थापन महाविद्यालयात प्रवेशासाठी पालक, विद्यार्थ्यांचा कल लक्षणीय वाढला आहे. विद्यार्थ्यांचा एमबीए अभ्यासक्रमाकडे वाढता कल पाहता शासनाने एमबीए प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत वाढवावी. राज्य सामायिक प्रवेश परीक्षेची तारीख जाहीर झाली असून परीक्षा १० आणि ११ मार्चला राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांनी १४ फेब्रुवारीला ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत." जिल्ह्यातील मॅनेजमेंट शिक्षण संस्थांत प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्याचे केआयटी आयएमईआरचे संचालक डॉ. एस. एम. खाडिलकर यांनी सांगितले. तसेच ही परीक्षा दिल्यावरच विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तींचा लाभ घेता येईल, असे सांगली येथील चिंतामणराव इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्चचे संचालक डॉ. विराज खोलकुंबे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाने एमबीए अभ्यासक्रमात गतवर्षीपासून आमूलाग्र बदल केले आहेत. शिवाजी विद्यापीठातील मॅनेजमेंट शिक्षण संस्थांत एचआर, मार्केटिंग, फायनान्स, प्रॉडक्शन सिस्टिम्स् (आयटी), ॲग्री असे स्पेशलायझेशन करण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, शिवाजी विद्यापीठातील मॅनेजमेंट शिक्षण संस्थांत एकाच वेळी दोन विषयात स्पेशलायझेशन करता येते. तसेच गतवर्षीपासून महाराष्ट्रात प्रथमच एमबीए अभ्यासक्रमात ओपन बुक, प्रॅक्टिकलचा समावेश केल्यामुळे उद्योग जगताशी विद्यार्थ्यांचा संपर्क येईल. तसेच प्रकल्प अभ्यासक्रमातही उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग वाढविला आहे. यावर्षीपासून इंटरनॅशनल बिझनेस हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट या विषयाचा एमबीए अभ्यासक्रमात समावेश केला आहे. यामुळेच विविध कंपन्या शिवाजी विद्यापीठातील महाविद्यालयांकडून एमबीए पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी देत आहेत. आज अनेक चांगल्या नोकरीच्या जाहिरातीत एमबीए पदवीधर हा निकष आवश्यक पात्रता म्हणून नमूद केलेला असतो. डॉ. विशाखा आपटे उपस्थित होत्या.

### अर्ज करण्याची मुदत वाढविण्याची मागणी

**इतर अभ्यासक्रम, कोर्समध्ये तुलनेत शासनाने एमबीए प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी २२ जानेवारी २०१८ ते १४ फेब्रुवारी २०१८ (२५ दिवस) दिले आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थी एमबीए प्रवेशासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. यासाठी शासनाने ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत वाढवावी, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे डॉ. सावंत, डॉ. खोलकुंबे यांनी सांगितले.**